


■ धाराशिव ■ दैनिक ■ वर्ष 2 रे ■ अंक 176 ■ मंगळवार,दि .5 ऑगस्ट 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# जिल्ह्यातील १९ ग्रामपंचायतींना मिळणार हक्काची इमारत

## राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत बांधकामास ४ कोटी ७५ लाख मंजूर

### इमारतीसाठी २० लाख तर नागरी सुविधा केंद्रासाठी ५ लाख रुपये मिळणार

सज्जन यादव | आरंभ मराठी

**धाराशिव**–केंद्र सरकारच्या पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत २०२५–२६चा वार्षिक आराखडा तयार करण्यात आला असून, यामध्ये धाराशिव जिल्ह्यातील १९ ग्रामपंचायतींना हक्काची इमारत मिळणार आहे. त्यासाठी शासनस्तरावर नागरी सुविधा केंद्रासाठी ५ लाख तर इमारत बांधकामासाठी २० लाख अशी एकूण २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये उमरगा तालुक्यातील ७, कळंब तालुक्यातील ४, तुळजापूर ४, लोहारा २, धाराशिव आणि परंडा प्रत्येकी १ अशा एकूण १९ ग्रामपंचायतीच्या बांधकामासाठी प्रत्येकी २५ लाख रुपये मिळणार आहेत.

ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज सुलभ होण्यासाठी संसदीय समितीच्या सूचनांनुसार ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधा घटकांतर्गत नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत आणि त्यासोबत नागरी सुविधा केंद्र खोली (सीएससी) मंजूर करण्यासाठी राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान राबविले जात आहे. ही योजना केंद्र पुरस्कृत असून यामध्ये केंद्राचा हिस्सा ६०% तर राज्याचा हिस्सा ४०% आहे. पंचायती राज मंत्रालयाच्या सेंट्रल एम्पॉवर्ड कमीटी च्या दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत ग्राम पंचायत बांधकामासाठी निधीची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या निकषानुसार नवीन ग्राम पंचायत इमारत बांधकाम व नागरी सुविधा केंद्र खोली (सीएससी) बांधकामासाठी एकूण २५ लाख रुपये तरतूद करण्यात आली आहे. यात ग्रामपंचायत इमारत बांधकामसाठी २० लाख रुपये तर नागरी सुविधा केंद्र खोली बांधकामसाठी रु.५ लाख रुपये उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. यामध्ये नागरी सुविधा केंद्र खोली (सीएससी) साठी स्वतंत्र प्लॅन निर्गमित केला आहे. तसेच सन २०२५–२६ च्या आराखड्यानुसार या खोलीकरिता ५ लाख रुपये इतका स्वतंत्र निधी उपलब्ध करुन देत असल्याने हे काम स्वतंत्ररित्या अथवा ग्रामपंचायत इमारतीच्या लगतच्या जागेत उपलब्धतेनुसार करावे लागणार आहे. नागरी सुविधा केंद्रासाठी स्वतंत्र बांधकाम केले नसल्यास ५ लाख रुपयांचा हा निधी खर्च करता येणार नाही, अशी अट ठेवण्यात आली आहे. या इमारतीचे बांधकाम हाती घेण्यासाठी जिल्हास्तरावरील सक्षम प्राधिकारी यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्यात येऊन बांधकामासाठी कार्यादेश देऊन बांधकाम पूर्ण करावे लागणार आहे.



### जिल्ह्याला ४ कोटी ७५ लाख रुपये मिळणार

धाराशिव जिल्ह्यातील १९ ग्रामपंचायतींच्या बांधकामासाठी या योजनेतून निधी मिळणार आहे. यामध्ये प्रत्येक ग्रामपंचायततीला २५ लाख रुपये मिळणार आहेत. १९ ग्रामपंचायतींच्या बांधकामासाठी या योजनेतून ४ कोटी ७५ लाख रुपये निधी खर्च करण्याचे उद्दिष्ट आहे.

### या ग्रामपंचायतींचे होणार बांधकाम

| गाव | – तालुका | – लोकसंख्या |
|---|---|---|
| कसगी | – उमरगा | – ४६६१ |
| येणेगुर | – उमरगा | – ६७४७ |
| आलुर | – उमरगा | – ७६४० |
| चिंचोली भुयार | – उमरगा | – ३१५४ |
| कुन्हाळी | – उमरगा | – ३०५४ |
| बलसुर | – उमरगा | – ६२४० |
| बेलंब | – उमरगा | – ४१६१ |
| कनगरा | – धाराशिव | – ३०३० |
| आंदोरा | – कळंब | – ३६२१ |
| गौर | – कळंब | – ३२२६ |
| पाडोळी | – कळंब | – ३२३३ |
| लोहटा पूर्व | – कळंब | – ३००२ |
| चिंचपूर (बु.) | – परंडा | – ३६७१ |
| धानुरी | – लोहारा | – ३८८२ |
| आष्टाकासार | – लोहारा | – ६१९० |
| जळकोट | – तुळजापूर | – ७९७१ |
| किलज | – तुळजापूर | – ३६४७ |
| खुदावाडी | – तुळजापूर | – ३४९२ |
| चिवरी | – तुळजापूर | – ३२४८ |

# कलाकेंद्रावर गोळीबार, राड्यानंतर कायदा सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

आरंभ मराठी | धाराशिव

कळंब तालुक्यातील चोराखळी येथील एका कलाकेंद्रावर दोन गटामध्ये राडा झाला असून, यादरम्यान झालेल्या गोळीबारात एक जण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जिल्ह्यात काही दिवसांपासून कायदा सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिल्ह्यात आळणी फाटा तसेच चोराखळी भागात कलाकेंद्राच्या माध्यमातून अनेक गैरप्रकार सुरू असून, यामुळे अनेकवेळा हाणामाऱ्या होत आहेत. मात्र, पोलिस प्रशासन याकडे हेतुपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. चोराखळी येथे महाकाली कलाकेंद्रावर दोन गटात वाद होऊन गोळीबाराची घटना घडली.यात एक व्यक्ती गंभीर जखमी झाला आहे. ही घटना घडलेला कालावधी, ठिकाण आणि पद्धत पाहता, जिल्ह्यात गुन्हेगारी प्रवृत्ती बिनधास्तपणे सक्रिय असल्याचे स्पष्टपणे अधोरेखित होते.

# तुतारी सोडून माजी आमदार राहुल मोटे हाती घेणार घड्याळ; आज मुंबईत होणार पक्षप्रवेश

आरंभ मराठी | भूम



भूम–परंडा विधानसभा मतदारसंघात राजकीय आखाडा पेटला असतानाच गेल्या अनेक दिवसाचे राजकीय शत्रू महायुतीच्या माध्यमातून एकत्र येत असताना दिसत आहेत. माजी आमदार राहुल मोटे आज महाराष्ट्राच्या राजधानीत शरद पवार यांची तुतारी सोडून हाती घड्याळ बांधणार असल्याने नेमका कुणाचा करेक्ट कार्यक्रम होणार याची चर्चा मतदारसंघात सुरू झाली आहे. परंडा मतदारसंघातील शरद पवार गटाचे माजी आमदार राहुल मोटे पक्ष फुटीमध्ये शरद पवार यांच्या बाजूने ठाम उभे राहिले होते. राहुल मोटे यांची भूम, परंडा, वाशी तालुक्यात चांगली ताकद असल्याचे झालेल्या विधानसभा निवडणुकीत दिसून आले आहे. महाविकास आघाडीच्या तिकिटावर निवडणूक लढवून अवघ्या दीड हजार मताने मताने पराभव झाल्याने हा पराभव मोटे यांच्या जिव्हारी लागला होता. गेल्या पंधरा दिवसापासून मोटे अजित पवार राष्ट्रवादी प्रवेश करणार अशी चर्चा सुरू झाली होती. राहुल मोटे यांनी याबाबत भूम परंडा वाशी तालुक्यातील प्रमुख कार्यकर्ते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांच्या समवेत बैठका घेऊन पक्ष बदलाचे संकेत दिले होते. वरिष्ठ पातळीवर सदरील चर्चेला पूर्णविराम देत आज (दि.५) दुपारी तीन वाजता प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात राहुल मोटे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करणार आहेत. या पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमाला परंडा मतदारसंघातील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत.

### महाविकास आघाडीला मोठा फटका बसणार

परंडा मतदारसंघात माजी आमदार राहुल मोटे यांच्या कार्यकर्त्यांची टीम मोठी असून राहुल मोटे यांच्यामागे जिल्हा परिषद, पंचायत समिती त्याचबरोबर खरेदी विक्री संघ, बाजार समिती आदी ठिकाणावर लोकप्रतिनिधी म्हणून राजकीय सक्रिय असलेल्या कार्यकर्त्यांची मोठी टीम आहे. शिवसेना ठाकरे गट व काँग्रेस यांच्या मदतीने राहुल मोटे हे विधानसभा निवडणुकीमध्ये विजयाच्या जवळ पोहोचले होते. राहुल मोटे यांच्या आज होणाऱ्या पक्षप्रवेशाने महाविकास आघाडीची जिल्ह्यातील ताकद कमी झाल्याचे आगामी निवडणुकीत दिसून येणार आहे.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या ढोकी शाखेची तिजोरी पुन्हा फोडली

## ३ लाख ३१ हजाराची रोकड चोरट्यांकडून लंपास

आरंभ मराठी | ढोकी







अडचणीत असलेल्या जिल्हा बँकेला अज्ञात चोरट्याने चुना लावला असून, धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील जिल्हा बँकेच्या शाखेत गॅस कटरच्या साह्याने तिजोरी फोडून तिजोरीतील तीन लाखाच्या वर रक्कम लंपास करण्यात चोरटे यशस्वी ठरले आहेत.धाराशिव जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या ढोकी येथील शाखेत अज्ञात चोरट्याने पाठीमागील बाजूस असलेल्या खिडकीचे गज गॅस कटरच्या साह्याने तोडून बँकेत प्रवेश मिळवला तसेच खिडकीच्या बाजूलाच असलेल्या तिजोरी गॅस कटरच्या साह्याने फोडून तिजोरीतील तीन लाख एकतीस हजार पाचशे रुपये रक्कम चोरून आज्ञात चोरटा पसार झाला. सदर घटना शनिवारी सायंकाळी साडेपाच ते सोमवारी सकाळी दहा वाजेच्या दरम्यान घडली आहे.

याबाबत बँकेचे शाखाधिकारी प्रताप प्रलादराव माने यांनी ढोकी पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत शुक्रवारी बँकेत १,२८,३१६ रुपये शिल्लक रक्कम होती. या रकमेत खातेदारांना वाटप भागणार नव्हते. त्यामुळे विनोद लावंड यांना मुख्य शाखेतून सात लाख रुपये आणण्याकरिता पत्र दिले. त्यांनी मुख्य शाखेतून तीन लाख रुपये आणले ती रक्कम बँकेच्या रेकॉर्डवर घेण्यात आली. शुक्रवार व शनिवार रोजी एकूण रक्कम ४ २८ ३१६ पैकी खातेदारांना वाटप करून बँकेत तीन लाख एकतीस हजार पाचशे रुपये शिल्लक होते. शनिवारी सायंकाळी शाखा बंद करतेवेळी पूर्ण रक्कम मोजून मी तिजोरीत ठेवली. तसेच सर्व खिडक्या बंद करून घेतल्या व बँक बंद करून मी माझ्या गावी मंगरूळला निघून गेलो. त्यानंतर सोमवारी सकाळी साडेदहा वाजता बँक उघडली असता बँकेची खिडकी उघडी असल्याची आढळून आले. पुढे जाऊन बघितल्यानंतर बँकेची तिजोरी गॅस कटरच्या साह्याने फोडलेल्या अवस्थेत दिसून आली व तिजोरीतील रक्कम गायब होती. या घटनेची माहिती तातडीने जिल्हा मुख्यालयातील प्रशासन अधिकारी संजय गायकवाड यांना सांगितली व तातडीने ढोकी पोलीस स्टेशनला येऊन या संदर्भातील माहिती दिली असे फिर्यादीत म्हटले आहे. शाखाधिकारी प्रताप माने यांच्या फिर्यादीवरून अज्ञाविरोधात ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार किशोर पांडुरंग माळी घटनेचा तपास करत आहे.

### तपास सुरू

जल्हा मध्यवर्ती बँकेत झालेल्या चोरीच्या घटनेचा तपास सुरू असून यासंदर्भात डॉग स्कॉड व फिंगरप्रिंट पथकाची मदत घेण्यात आली आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व टेक्निकल बाजूने तपास करण्यात येत आहे.

विलास हजारे

**सहाय्यक पोलीस निरीक्षक,** ढोकी पोलीस स्टेशन.

### निराधारांच्या योजनेची रक्कम

लाडकी बहीण योजना, पी एम किसान योजना व निराधार योजनेतील लाभार्थ्यांना रक्कम वाटप करण्यासाठी मुख्य शाखेतून रक्कम मागून घेण्यात आली होती. शनिवारी रक्कम व्यवस्थित मोजून बँकेच्या तिजोरीत ठेवल्यानंतर शाखा बंद करून मी माझ्या गावी गेलो. सोमवारी शाखा उघडल्यानंतर सर्व प्रकार समोर आला.

– **प्रताप माने,** शाखाधिकारी, ढोकी.

# अवैध धंद्यांविरोधात निवेदन देणारेच निघाले जुगारी

## उमरगा पोलिसांची कारवाई; ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

आरंभ मराठी | मुरूम

उमरगा तालुक्यातील कदेर व सेवानगर तांडा परिसरात सुरू असलेल्या अवैध दारू विक्री व जुगार अड्ड्यांविरोधात सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलिसांकडे निवेदन देत तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र अवघ्या १२ तासांत पोलिसांनी केलेल्या कारवाईत निवेदन देणारेच कार्यकर्ते अवैध जुगार खेळताना रंगेहात पकडले गेले असून, ही घटना सध्या संपूर्ण परिसरात चर्चेचा विषय बनली आहे.

२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता सामाजिक कार्यकर्ते रोहित चव्हाण, आकाश राठोड, शरद आडे, सुमित चव्हाण, सचिन चव्हाण तसेच तंटामुक्ती अध्यक्ष महादेव साखरे यांनी कदेर व सेवानगर तांड्यातील नागरिकांच्या स्वाक्षरीसह एक निवेदन उमरगा पोलीस ठाणे व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात दिले होते. यामध्ये त्यांनी गावातील अवैध दारू विक्री व जुगारधंदे तात्काळ बंद करण्याची मागणी केली होती. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला होता. पोलिस निरीक्षक अश्विनी भोसले यांच्या नेतृत्वाखालील पथकाने त्याच दिवशी सायंकाळी गोपनीय माहितीच्या आधारे मौजे कदेर व सेवानगर तांडा येथे छापे टाकले. या प्रकरणात विशेष लक्षवेधी बाब म्हणजे ज्या सामाजिक कार्यकर्त्यांनी अवैध धंद्यांविरोधात निवेदन दिले होते, त्यातीलच रोहित चव्हाण व आकाश राठोड हे सेवानगर तांड्यात तिरट जुगार खेळताना पोलिसांच्या जाळ्यात अडकले. त्यामुळे त्यांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर, अप्पर पोलीस अधीक्षक शफकत आमना, उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईसाठी पो.नि. अश्विनी भोसले, पो.उ.नि. गजानन पुजरवाड, सहाय्यक फौजदार प्रदीप ओव्हळ, पो.हे.का. कोनगुलवार, पो.ना. अनुरुद्र कावळे, पो.कॉ. नवनाथ भोरे, पो.कॉ. बाबासाहेब कांबळे यांनी विशेष मेहनत घेतली.

### गावठी दारू विरोधात कारवाई

वसंत गोपाळ राठोड यांच्याकडून ६,५०० किमतीची ६५ लिटर गावठी हातभट्टी दारू जप्त करण्यात आली. तर शिवाजी चंदू राठोड यांच्याकडून ७,००० किमतीची ७० लिटर गावठी दारू जप्त करून महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

### तिर्रट जुगार प्रकरणात ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

रोहित राजेंद्र चव्हाण (निवेदनकर्ता), आकाश दिलीप राठोड (निवेदनकर्ता), अशोक निळकंठ पवार, गुलाब भिल्लु चव्हाण, अनिकेत भगवान राठोड, कमलाकर हिरा जाधव, अजय विठ्ठल पवार, जयसिंग लालू राठोड यांच्याकडून रोख रक्कम, ७ मोबाईल, एक कार (–२५––१२२८), मोटरसायकल (–३२––६९३४) व जुगार साहित्य असे एकूण ८,२३,११० रुपये किंमतीचे साहित्य जप्त करण्यात आले. तर कदेर येथील कारवाईत तानाजी भोजू बनसोडे, प्रमोद हनुमंत कोराळे, सचिन बलभीम भाले, संतोष राम बनसोडे, रमेश रानबा बनसोडे, अरुण तात्याराव बनसोडे यांच्याकडून रोख रक्कम, २ मोबाईल व जुगार साहित्य असा एकूण १६,०६० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
संपादकीय
मंगळवार,दि .5 ऑगस्ट 2025

# वाईट व्यक्तींसोबत जशास तसे वागावे की नको?



जेव्हा आपण माणसं वाचायला शिकतो तेव्हा कोणती माणसं कशी आहेत ते हळूहळू लक्षात येते. काही माणसं खूप चांगली असतात.काही माणसं थोडी चांगली आणि थोडी वाईट असतात.काही माणसं नेमके कसे आहेत ते कळतच नाही आणि काही माणसं मात्र स्वतःला फार हुशार,स्मार्ट आणि इतरांपेक्षा वेगळे सम जतात.स्वत:ला हुशार समजणारे ही माणसे ढोंगी,कपटी आणि तिरसट स्वभावाची असतात.ही माणसं मनमानी वर्तन करतात व इतरांना नावे ठेवतात. अशा लोकांना स्वत:चा मोठेपणा स्वतः सांगायची आणि इतरांना कमी लेखायची घाण सवय असते.अशा लोकांसोबत जशास तसे वागून त्यांची अक्कल काढण्याची गरज असते परंतु चांगले लोक अशा तिरसट स्वभावाच्या माणसांकडे दुर्लक्ष करतात.मुर्खांच्या नादाला लागून कशाला वाईट व्हायचे?असे विचार करून नेहमी वाईट वागणाऱ्या लोकांकडे डोळेझाक करतात.आपण ज्या समाजात राहतो त्या समाजात काही विचित्र स्वभावाचे लोक असतात.समाजात मिसळत नाहीत,समाजकार्यात भाग घेत नाहीत,कधी कोणाच्या उपयोगाला पडत नाहीत.समाजाच्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेत नाहीत.कोणाच्या लग्नकार्यात पुढे येऊन हातभार लावत नाहीत. समाजातील कोणती व्यक्ती मरण पावली तर अंत्यविधीला येत नाहीत,आले तर पाहुण्यासारखे लांब राहतात.खांदा देण्याचा तर प्रश्नच उरत नाही.असे लोक जेव्हा त्यांच्यावर वेळ येते तेव्हा मात्र असे काही ज्ञान पाजळतात की ते ज्ञान थक्क करणारे असते.मग रागारागाने समाजबांधवांना नावे ठेवतात.अशा वेळी त्यांना कोणीतरी सांगण्याची गरज असते की इतरवेळी तू कोठे असतोस?आज तुझ्यावर वेळ आली म्हणून त्रागा करण्याची गरज नाही.तू अगोदर समाजाच्या कामी ये मग तोच समाज तुझ्या मदतीला धावून येईल. काही व्यक्तींना योगायोगाने मोठ्या पदावर काम करण्याची संधी मिळाली की त्या पदाचा गैरवापर करतात.आपल्या सर्व सहकाऱ्यांना समजून घेणे गरजेचे असते,आपल्या सहकारी कर्मचारी लोकांना सन्मानाची वागणूक द्यायची असते आणि त्यांच्याशी आदराने बोलायचे असते हे लक्षात घेऊन आपले काम प्रामाणिकपणे करायचे असते.पण अशा गर्वीष्ठ लोकांना पदाचा दुराभिमान जडतो आणि सहकाऱ्यांना कमी समजण्याची उर्मी चढते.स्वत: कधी प्रॉम्प्ट नोकरी करायची नाही दुसऱ्यांना मात्र नोकरी कशी करावी याबाबत शहाणपणाचे डोस पाजत राहायचे.अशा व्यक्तींना त्यांची चूक दाखवून दिली की मग त्यांच्या अंगाचा तिळपापड होतो.मग असे लोक आपल्या पदाचा गैरवापर करत चूक दाखवून देणाऱ्या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावतात.आणि योगायोगाने मिळालेल्या मोठ्या पदावरून पायउतार व्हावे लागले की मग हिरमुसतात.पद गेल्यावर कोणात मिसळत नाहीत,आणि मीच स्वतःहून पद सोडले म्हणून सांगतात.खरेतर अशा व्यक्तींसोबत जशास तसे वागायचे असते.पण चांगले लोक वाईट वागण्याची कधीच हिंमत करत नाहीत.आपल्या नातेवाईकांमध्ये एक दोन नमुनेदार नातेवाईक असतात जे स्वतः ला फार मोठा,श्रीमंत,ज्ञानी, शहाणा,उद्योगी आणि कर्तृत्वान समजतात.या महाशयांना इतर नातेवाईकांना नावे ठेवण्याची घाण सवय असते.कोणाच्या लग्नाला गेले की ही सोयरीक मीच जुळवली बरं का म्हणून चारचौघात अभिमानाने सांगतात.प्रत्यक्षात त्या लग्नाचा आणि यांचा काहीच संबंध नसतो.तरीही लग्न कार्यात पुढे पुढे करून असे दाखवून देतात की यांच्याशिवाय कामाचे एकही पान हलत नाही.मग हे महाशय लग्न लागताना स्टेजवर जातात,मंगल अष्टिका म्हणण्याचा प्रयत्न करतात.गरज नसली तरी नवरा नवरीला काही तरी कानात सांगणार.लग्न लागल्यावर सुरुची भोजनाचा आस्वाद घेणाऱ्या लोकांशी बिनकामाच्या गोष्टी करणार.हे लग्न जमविण्यात माझाच पुढाकार होता म्हणून पुन्हा पुन्हा सांगणार.तेव्हा कोणीतरी त्याला म्हणायला पाहिजे,हे बघ बाबा तू भी जेव आणि आम्हाला ही जेवण करू दे.पण हिंमत कोणी करत नाही.आजकाल काही लोक फार वाईट वागत आहेत.गरज नसताना स्वतःबद्दल मोठेपणाच्या गोष्टी सांगत आहेत.इतरांना मात्र नावे ठेवत आहेत.काही लोक वाईट वागतात आणि इतरांना वाईट वागू नका म्हणून सांगतात.स्वत: वाईट कृत्ये करतात आणि इतरांना सत्कर्म करायला सांगतात.काही राजकारणी व कार्यकर्ते दुसऱ्या राजकीय पक्षातील लोकांना नावे ठेवण्याची एकही संधी सोडत नाहीत.पण त्यांना इतरांनी नावे ठेवली की मग आगपाखड करून घेतात. तिरसट स्वभावाचे काही शिक्षक विद्यार्थ्यांना चुकीची माहिती सांगून इतर शिक्षकांबद्दलविद्यार्थ्यांच्या मनात गैरसमज पसरवत आहेत.विद्यार्थ्यांची स्तुती करून विद्यार्थ्यांच्या मनात स्वतःबद्दल आदराचे स्थान निम र्ण करत आहेत.अशा शिक्षकांना कोणी तरी त्यांची असलियत व त्याचा ढोंगीपणा सांगण्याची गरज असते. एखाद्या घरातील एक महिला इतर सगळ्या महिलांना सतत नावे ठेवते.स्वत: कसेही वागून इतर महिलांचे उणेदुणे काढते.अशा दुटप्पी वागणाऱ्या लोकांना कोणीतरी चार शब्द सुनावण्याची गरज असते पण पुन्हा तीच मानसिकता...कशाला नुसती उठाठेव करायची.कशाला वाईटांच्या तोंडाला लागावे.हे खरे आहे की वाईट वागणाऱ्या लोकांसोबत जशास तसे वागणे काळाची गरज आहे.पण तशी हिंमत कोणी करत नाही.म्हणून वाईट लोकांचे फावते आणि ते आणखी वाईट वागतात.हे रहाटगाडगे असेच चालत राहणार आहे,चांगले लोक अभ्याग्याचा मार खात राहणार आहेत.



बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो.९५४५४४२६४८.

# फ्रेंडशिप डे अनाथ बालकांसोबत साजरा करून महिलांनी जपली सामाजिक बांधीलकी




आरंभ मराठी | धाराशिव

रविवारी सर्वत्र साजऱ्या करण्यात आलेल्या फ्रेंडशिप डेचा आनंद अनाथ बालकांसोबत साजरा करून धाराशिव शहरातील महिलांनी सामाजिक बांधिलकी जपली. 'मैत्री म्हणजे केवळ गप्पा, चहा आणि सेल्फी नव्हे...मैत्री म्हणजे कुणाच्या तरी जीवनात आनंदाचे रंग भरणे' असा संदेश देत 'आम्ही व्हाट्सएपच्या महिला' या समूहातील सदस्यांनी याच भावनेतून फ्रेंडशिप डेचा खास दिवस साजरा केला तोही थेट धाराशिव येथील अंकुर शिशुगृहातील निराधार बालकांसोबत.

रविवारी (दि.३) महिलांनी शिशुगृहात जाऊन बालकांसोबत गाणी, गोष्टी, खेळ आणि खाऊ वाटपाचे कार्यक्रम घेतले. लहानग्यांचे निरागस हास्य आणि त्यांच्या डोळ्यांत झळकणारा आनंद पाहून महिलांच्या डोळ्यांतही आनंदाश्रू उभे राहिले. या उपक्रमामागचा हेतू स्पष्ट करताना आयोजक महिलांनी निरागस चेहऱ्यावर हास्य फुलवण्याइतका आनंद नसल्याचे सांगितले. संस्थेच्या वतीने सर्व महिलांचे स्वागत करून त्यांना फ्रेंडशिप डेच्या शुभेच्छा देण्यात आल्या. उपस्थित महिलांमध्ये अर्चना अंबुरे, मंजुषा वैराळे, सुनीता पडवळ, चारुलता सावंत, दमयंती साळवी, ज्योती शिरपुरकर, गायत्री सुपेकर आणि भारती जाधव यांचा समावेश होता. या उपक्रमाचे आयोजन फेरोज पल्ला यांनी केले होते.

# ग्रंथालयाचे मनोगत



मित्रानो,मी आहे एक ग्रंथालय .गेल्या अनेक वर्षापासून शासकीय ग्रंथोत्सव साजरे जातात.मूळ उद्येश स्वागतार्ह आहे.माझ्या बाबतीत या ग्रंथोत्सव येथे जी मोठ मोठी भाषणं झाली.त्यांनी तुम्हाला माझा इतिहास ऐकवला,तो संपूर्ण असत्य नाही.पण त्यातील काही भ्रामक सत्याने तुम्हा श्रोत्यांची दिशाभूल झाली.ही दिशाभूल दूर करण्यासाठीच मी आज बोलत आहे.एका विद्वानांच्या वैयक्तिक ग्रंथ संग्रहातूनच माझा जन्म झाला.ग्रंथ खरेदी करून त्याचे वाचन करण्याचे त्या माणसाला विलक्षण वेड होते. तो त्याचा छंदच होता. स्वतः च्या मृत्युपूर्वी हजारो पुस्तकांचा संग्रह असलेले आपले ग्रंथालय त्याने सर्वासाठी खुले केले. पुढे या ग्रंथालयाची जबाबदारी शासनाने उचलली आणि हे शासकीय सार्वजनिक नगरवाचानालय बनले.या घटनेला आज शंभर वर्ष पूर्ण होऊन झाली.या नव्या रूपात माझा खूप विस्तार झाला. माझ्यासाठी ही स्वतंत्र इमारत बांधण्यात आली.येथे पुस्तके ठेवण्यासाठी खास कपाटे बनवण्यात आली.घरांथाची देखभाल करण्यासाठी माणसे नेमण्यात आली.तरीही जीवन सार्थकी लागल्याचे समाधान मला वाटत नाही.येथे येणाऱ्या लोकांपैकी किती जण खरेखरे वाचनाचे भोक्ते असतात.! काही जण केवळ रिकामा वेळ आणि राजकिय हेतूने येतात,तर काही जण नित्य नियमाची सवय म्हणून येतात. हे ठिकाण कित्येकांच्या भेटीचे संकेतस्थळ बनले आहे.असा अनिष्ट हेतू ठेवून येणाऱ्या लोकांचे ' ग्रंथाशी ' सोयरसुतक ही नसते.आता वाचक म्हणून येणारा बराच मोठा वर्ग हा दैनिक,मासिके,नियतकालिके, यांच्या पाशीच घुटमळणारा असतो.त्यांना नैमित्तिक राजकारण व गावाच्या परिसरातील भानगडी यातच रस असतो.रीतसर वर्गणी भरून घरी वाचायला पुस्तके नेणारा दुसरा एक वर्ग आहे.हे लोक स्वतःला मोठे वाचक ,विद्वान समजतात.पण यांची मागणी असते ती कथा , कादंबऱ्या च्य ,क्वचित कविता संग्रहा ची.माझे दुःख हेच आहे.या नगरवाचनालयातील खऱ्या ज्ञानाचा साठा असणाऱ्या ग्रंथ सागराकडे कोणी वळत नाही. किती तरी अमूल्य ग्रंथ आज वर्षानुवर्ष धूळ खात पडले आहेत.आजसुध्दा पाहा,य इमारतीची रंगसफाई झाली. पण ते ज्ञानमय ग्रंथ कोणी झटकले देखील नाहीत. त्यामुळे मग त्यांना वाळवी लागते. कसर लागते. अहो,येथील कित्येक ग्रंथ गहाळ झाले आहेत.ज्या म ाणसांनी ते नेले त्यांनी ते परत केले नाहीत.' ग्रंथालये म्हणजे ज्ञानाची सदावर्ते असे साहित्य सम्राट न. चिं.केळकर सांगून गेले,पण या सदावर्ता कडे कोणी ज्ञान पिपासू फिरकत नाही,हीच माझी व्यथा आहे.''थोर विचारवंत रस्किन सांगतो की,पुस्तके नसलेलं घर खिडक्या नसलेल्या खोली प्रमाणे असते.खिडकी नसलेल्या खोलीत गुदमरायला होते.त्याप्रमाणे जेथे ग्रंथ वाचले जात नाहीत तेथे जीवन गुदमरतो.ग्रंथ वाचन सातत्याने करणारे सतत जागृत राहतात. प्रगती करतात.म्हणून तर डॉ,बाबासाहेब सांगतात की,'' वाचाल तर वाचाल ''मानव निर्मित ग्रंथ हे मानवांच्या च सुखसाठी असतात.कथा, कादंबऱ्या ,काव्य हे माणसाचे मनोरंजन करतात,पण त्याच बरोबर ते वाचकाचे प्रबोधनही करत असतात.महाभारत, रामायण सारखे ग्रंथ हजारो वर्षापूर्वी लिहिले गेले,पण आजही लक्षावधी वाचकांना एका जागी खिळवण्याचे विलक्षण सामर्थ्यत्यांच्यात आहे.भगवान श्री कृष्णा नी अर्जुनाला सांगितलेली भगवत गीता '' आजही अनेकांना प्रेरणादायी ठरली आहे. गुरुविना ज्ञान नाही असे आपण मानतो.पण काही वेळेला मानवी गुरू उपलब्ध होऊ शकत नाही.त्याच्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकत नाही. एकलव्याने जसे द्रोणाचार्य यांचा पुतळा करून त्या पुतळ्याला गुरू मानले,तसे आजच्या काळात ग्रंथ हे पर्यायी गुरुंचे काम करू शकतात.



सोमनाथ बेलुरे
धाराशिव
मो.८५००३६६४६

# सोशल मीडिया की पेट्रोल बॉम्ब

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्म आणि कर्मभूमीतील पुणे–सोलापूर रस्त्यावरील दौंड तालुक्यातील यवत हे गाव पिढ्यानपिढ्या जातीय सलोख्याचे एक उत्तम उदाहरण म्हणून ओळखले जाते. या गावात दरवर्षी तुकोबांच्या पालखीचा मुक्काम असतो. वारक–यांची भूक शमविण्यासाठी प्रत्येक घराघरातून भाकरी पुरवल्या जातात. विशेष म्हणजे यात सर्वधर्मिय सेवेक–यांसमवेत मुस्लिम समाजही आघाडीवर असतो. दंगलीचा कोणताही पूर्वइतिहास नसलेल्या या आदर्श गावाला मात्र ३१ जुलैला एका माथेफिरू, बेवड्या इसमाच्या स्टेटसमुळे काही समाजकंटकांनी दंगलीचे 'गालबोट' लावून गावातील सलोख्याला तडा देण्याचा 'नतद्रष्ट'पणा केला. यवतच्या ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, २६ जुलैच्या मध्यरात्री गावापासून ३/४ किलोमीटर असलेल्या एका वस्तीवरील, मुळच्या बिहार किंवा बांगलादेशामधील एका तरुणाने स्टेशनजवळील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची विटंबना केली. दुस–या दिवशी ही बाब समजताच, गावात तणाव निर्माण झाला. या घटनेचा निषेध करण्यासाठी समस्त गावक–यांनी 'निषेध मोर्चा' काढला; आणि सदर माथेफिरू तरुणाला त्वरित अटक करून कठोर शिक्षा करण्याची मागणी करण्यात आली. या मोर्चात स्थानिक मुस्लिमही सहभागी झाले होते. पोलिसांनी २ संशयितांना ताब्यातही घेतले होते. पण, नंतर कारण नसताना काही हिंदूत्ववादी संघटनांनी पुन्हा संध्याकाळी ५ वाजता 'जनआक्रोश मोर्चा' काढण्याचे ठरविले. या मोर्चात मुस्लिमांना सामिल होण्यास मज्ज़ाव करण्यात आला. तशा पोस्टही समाज माध्यमातून व्हायरल करण्यात आल्या. वातावरण बिघडून कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून स्थानिक मुस्लिमांनी समजूतदारपणाची भूमिका घेत, सदरच्या मोर्चात सामिल न होण्याचा अभिनव निर्णय घेतला. या मोर्चात उरळी येथील अक्षय कांचन नामक तरुणाने अत्यंत प्रक्षोभक भाषण केले. नंतर ३१ जुलै रोजी 'निषेध सभा' घेण्यात आली. यात गोपीचंद पडळकर आणि संग्राम जगताप यांनी प्रक्षोभक आणि चिथावणीखोर भाषणे केली. या भाषणांमुळे जणू काय आगीत तेल ओतले गेले. सभा संपताच, काही जमाव रस्त्यावर उतरला. पुणे–सोलापूर महामार्गावर टायर जाळून वाहतूक रोखण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यातच एका माथेफिरू तरुणाने आक्षेपार्ह स्टेटस ठेवले. त्यामुळे परिस्थिती बिघडली आणि प्रक्षुब्ध जमावाने सदर तरुणाचे घर जाळले. नंतर मशिद आणि काही धार्मिक स्थळांवर मोठ्या प्रमाणात दगडफेक करण्यात आली. काही दुकाने, वाहने पेटवण्यास सुरुवात झाली; आणि शांत समजले जाणारे यवत शहर पेटण्यास सुरुवात झाली. मोठ्या प्रमाणात जमाव रस्त्यावर उतरला होता. पोलिसांनाही तो आवरता येत नव्हता. अखेर अश्रूधुराच्या नळकांड्या फोडून जमाव पांगवण्यात पोलिसांना यश



आले.छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान कोणताही हिंदू खपवून घेणार नाही, हे मान्य आहे; आणि याबद्दल कोणाचे दुमतही नसावे. परंतु एका थुकरट सामान्य तरुणाच्या स्टेटसमुळे (१०/१२ व्यक्ती बघतील इतकीही त्याची लायकी नसेल ) एक शांत आणि आदर्श गाव पेटावे? ही अतिशय चिंताजनक आणि विचार करायला लावणारी बाब आहे. याआधी अमरावती, नाशिक, नागपूर, परभणी पेटले होते. कोल्हापूर, नगर, श्रीरामपूर येथे तणावग्रस्त वातावरण निर्माण झाले होते. कारण काय तर एखाद्या टीनपाट व्यक्तीने केलेली आक्षेपार्ह पोस्ट किंवा ठेवलेले स्टेटस? एखाद्या सेलिब्रेटिज किंवा राजकीय नेत्याने अशी पोस्ट केल्यास समजू शकतो. पण, एका सर्वसामान्य बेवड्याच्या थुकरट पोस्टमुळे रस्त्यावर उतरण्याइतक्या आपल्या भावना संकुचित झाल्या आहेत का? अशा निंदनीय गोष्टीचा निषेध प्रत्येकाने केलाच पाहिजे. तसा अधिकारही आहे. परंतु हातात दगड घेऊन रस्त्यावर उतरणे हे मात्र नक्कीच चुकीचे आहे. राजकीय नेते अशा असंवेदनशील आणि दुर्दैवी घटनांचा आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी प्रयत्न करणारच. कारण, तो त्यांचा 'जन्मसिद्ध हक्क आहे'. त्याशिवाय त्यांचे दुकान कसे चालणार? 'आक्रोश मोर्चा'च्या नावाखाली प्रक्षोभक विधाने, मिमीक्री आणि सिनेमांचे डायलॉग मारून 'राजकीय इव्हेंट' करणे, आणि दोन जातींत तणाव निर्माण करणे, हा त्यांचा 'गोरखधंदा'च झाला आहे.कीव येते ती 'अंधभक्त' कार्यकर्त्यां(?)ची. एखाद्या कुत्र्याला छू म्हणावे अन् त्याने एखाद्याच्या मागे धावावे, अशाप्रकारे हे 'अंधभक्त' नेत्याच्या तोंडातून आदेश बाहेर पडताच रस्त्यावर उतरून धुडगूस घालतात. यवतच्या बाबतीत असेच घडले आहे. काल राज ठाकरे यांनी पनवेल येथे डान्सबारबाबत वक्तव्य करताच मनसैनिकांनी डान्सबार फोडण्यास सुरुवात केली. अर्थात, डान्सबार संस्कृतीही समाजासाठी घातकच आहे. त्यावर कायद्याने बंदी आणण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. फोडणे, मारणे, धमकावणे, जाळपोळ करणे हा यावरचा उपाय योग्य वाटत नाही, याचा अंधभक्तांनी विचार करायला हवा. आंदोलनात तुमची डोकी फुटतात, तुम्ही गंभीर जखमी होतात. प्रसंगी एखाद्याचा जीवही जातो. काही दिवस तुरुंगाची हवा खावी लागते. नंतर केस दाखल होऊन कोर्टाच्या चकरा सुरू होतात. तुमचा नेता मात्र तुमची ही मजा मस्तपणे वातानुकूलित अलिशान गाडी किंवा बंगल्यात बसून बघत असतो. आजपर्यंत एखादा नेता कधी अशा आंदोलनात उतरल्याचे, त्याचे डोके फुटल्याचे किंवा तो ४/५ दिवस तुरुंगात राहिल्याचे बघितले आहे का? यांच्यावर शक्यतो गुन्हे दाखल होत नाहीत. झाल्यास कासवगतीने तपास होतो. पुढे खटला दाखल झाला; आणि शिक्षा जरी झाली तरी तिला त्वरित स्थगितीही मिळते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे, वादग्रस्त माणिक'राव'(?) कोकाटे आणि बच्चू कडू(?) ही आहेत, असो. सांगायचे तात्पर्य एवढेच की, अंधभक्त कार्यकर्त्यांनी आता डोळे उघडले पाहिजेत.कारण तुमचा आणि तुमच्या नेत्याचा काही तासांचा होतो खेळ. पण, यात निष्कारण भरडला जातो तो घटनेशी काही संबंध नसलेला सर्वसामान्य नागरिक, चाकरमाने, हातावर पोट असणारा मोलमजूर, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि विद्यार्थीवर्ग. अशा काही घटनांत अनेक निष्पाप कायमचे जायबंदी झाल्याचे तर काही हकनाक प्राणाला मुकल्याचे अनेक उदाहरणे आहेत. तेव्हा आता तरी अशा घटना टाळल्या पाहिजेत, असे प्रकर्षाने जाणवते.यवत असो किंवा याआधी काही शहरांत केवळ एका पोस्ट किंवा स्टेटसने उसळलेल्या दंगलींवरून किंवा दंगलसदृष्य परिस्थिती निर्माण झाल्यावरुन अनेक मूलभूत प्रश्न मनाला पडल्याशिवाय राहत नाही. समाज म्हणून आपल्या प्रत्येकाच्या भावना आणि विचार इतके संकुचित, तोकडे, तकलादू आणि स्फोटक झाले आहेत का? एका बेवड्या थुकरट समाजकंटकाच्या स्टेटसमुळे शहर पेटावे? वर्षानुवर्षे जपलेला सलोखा एका स्टेटसमुळे धुळीस मिळावा? आपण एक विचारी समाज आहोत की पेट्रोल बॉम्ब? शांततेत आणि सुखात जीवन जगणा–या या शहरांत भडका कोणी उडविला? कशासाठी पेटविली ही शहरे? यातून या 'नतद्रष्ट्यां'ना काय साध्य करायचे आहे? समाज म्हणून आपल्याला हे परवडणारे आहे का? असा विचार प्रत्येकाने करायला नको का? अशा म ाथेफिरूंवर कायद्याचा वचक राहिला नाही का? एका पोस्ट किंवा स्टेटसने जर एक शहर पेटणार असेल तर, असे कितीतरी माथेफिरू आपल्या मोबाईलमध्ये बॉम्ब घेऊन फिरत असतील, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. शहरांचा भडका उडवणा–या अशा समाजकंटकाच्या वेळीच मुसक्या आवळणे गरजेचे आहे. नाहीतर भविष्यात अनेक शहरांत असा भडका उडाला तर, आश्चर्य वाटायला नको. यवतमधील दंगल कोणी घडविली? ती पूर्वनियोजित होती का? सामाजिक सलोख्याला गालबोट कोणी आणि कशासाठी लावले? यातून त्यांना नेमके काय साध्य करायचे होते? या प्रश्नांची उत्तरे पोलिसांनी त्वरित आणि योग्य तपास केल्यावरच मिळतील. साध्या एका पोस्ट किंवा स्टेटसमुळे शहर पेटत असेल तर, 'मोबाईल शाप आहे की वरदान'? आणि सोशल मीडिया हा 'पेट्रोल बॉम्ब' ठरतोय का? हे प्रश्न निर्माण होणे साहजिकच आहे. खरेतर सामाजिक सलोखा राखणे हे नेत्यांचे आद्यकर्तव्य आहे. पण तेच आपला राजकीय स्वार्थ साधण्यासाठी, प्रक्षोभक आणि चिथावणीखोर वक्तव्य करून, आगीत तेल ओतण्याचा करंटेपणा करतात. हे कालच्या यवतच्या आणि आंतरवली सराटीत बाराम तीचा 'करामती' काका आणि माजी मुर्ख मामू (माजी मुख्यमंत्री, त्यांनी स्वतःच्याच तोंडाने हे कबूल केले होते) त्यामुळे अशा घटना टाळण्यासाठी आपल्या प्रत्येकाची जबाबदारी वाढली आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

– प्रदीप व्ही. खोलमकर,
नाशिक.
मो– ८७६७५९२९८०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

CMYK



# महिना अखेरपर्यंत १०८ फूट शिल्पासाठी देशातील शिल्पकार सादर करणार नमुने

## तुळजाभवानी मंदिर समितीचे विश्वस्त तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

आरंभ मराठी | धाराशिव

तुळजाभवानी माता छत्रपती शिवरायांना आशीर्वाद देत असतानाचे १०८ फूट उंचीचे भव्य शिल्प तुळजापुरात आता लवकरच साकारले जाणार आहे. अष्टभुजा 'शिवभवानी'चा अंगावर शहारे आणणारा प्रेरणादायी विचार त्यानिमित्ताने सर्व भाविकांना अनुभवता येणार आहे. त्यासाठी राज्याच्या कला संचालनालयाकडे देशभरातील शिल्पकारांकडून शिल्प नमुने मागविण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. ऑगस्ट अखेरीस अडीच ते तीन फूट आकाराचे फायबरचे शिल्प नमुने कला संचालनालयाकडे प्राप्त होणार आहेत. त्यातून पहिल्या पाच शिल्पांची निवड करून त्या पाच शिल्पापैकी एक शिल्प अंतिम केले जाणार आहे. हे शिल्प शिवछत्रपतींनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या प्रेरणेची जाज्वल्य गाथा असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.




आमदार राणा जगजितसिंह पाटील म्हणाले, मुंबईच्या निर्मल भवन येथील मित्र संस्थेच्या कार्यालयामध्ये तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या अनुषंगाने एक उच्चस्तरीय बैठक झाली होती. या बैठकीस जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष किर्ती किरण पूजार हे देखील उपस्थित होते. या बैठकीत ऐतिहासिक आणि आध्यात्मिक दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. १०८ फूट उंच शिल्प उभारण्याच्या प्रस्तावावर सखोल चर्चा झाली. सुप्रसिद्ध इतिहासकार आणि शिवव्याख्याते पांडुरंग बलकवडे यांनी या प्रसंगाचे ऐतिहासिक संदर्भ, शिलालेख, ग्रंथ व लोक परंपरेवर आधारित माहिती सादर केली. राज्य पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे यांनी आई तुळजाभवानी देवीच्या मूर्तीचे स्वरूप सादर केले. या प्रेरणादायी आणि भव्य शिल्पाभोवती आकर्षक परिसर विकास, प्रकाश योजना, संग्रहालय व माहिती केंद्र उभारण्यात येणार आहे. त्यामुळे तीर्थक्षेत्र तुळजापूरच्या सौंदर्यात आणखी वाढ होणार आहे. या शिल्पासाठी कला संचालनालय आणि पुरातत्व विभाग यांच्याकडे जबाबदारी सोपवण्यात आली आहे. देशभरातील नामवंत शिल्पकारांना शिल्पाचे नमुने सादर करण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. ऑगस्ट अखेरीस अडीच ते तीन फूट आकाराचे फायबरचे शिल्प नमुने सादर करण्यात येणार आहेत. त्यातून उत्कृष्ट पाच शिल्प नमुन्याची निवड होणार आहे. या पाच सर्वोत्तम शिल्पापैकी सर्वोत्कृष्ट शिल्प निवडल्यानंतर प्रत्यक्ष शिल्प उभारणीस प्रारंभ केला जाईल.

### शिल्पकारांना १७.५ लाख रुपये मानधन

फायबर मॉडेल तयार करण्यासाठी इच्छुक शिल्पकारांकडे शिल्प कलेतील पदवी अथवा पदविका असणे आवश्यक आहे. याशिवाय किमान १५ वर्षांचा व्यावसायिक अनुभव असणेही अपेक्षित आहे. तयार करण्यात आलेल्या फायबर मॉडेल्स मधून एकूण पाच मॉडेल्सची निवड समितीद्वारे करण्यात येणार आहे. निवड झालेल्या प्रत्येक शिल्पकाराला दीड लाख रुपये मानधन देण्यात येणार आहे. तसेच अंतिम निवड झालेल्या सादरकर्त्याला १० लाख रुपयांचे मानधन देण्यात येणार आहे. देशभरातील कला उपासक शिल्पकारांनी या ऐतिहासिक संधीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

# मेलडी स्टार्सच्या गायकांची महंमद रफी यांना गायनातून आदरांजली



आरंभ मराठी | धाराशिव

कलाविष्कार अकादमी द्वारा मेलडी स्टार्सच्या वतीने प्रख्यात गायक मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी दिनी त्यांनी गायलेल्या गीतांचे गायन करुन आदरांजली वाहण्यात आली. प्रथम मेलडी स्टार्सचे मुख्य प्रवर्तक युवराज नळे, समन्वयक शरद वडगावकर, सहसमन्वयक मल्हारी माने यांच्या हस्ते प्रतिमा पुजन करण्यात आले. त्यानंतर मुकुंद राजे, मुकुंद पाटील मेंढेकर, कलाध्यापक शेषनाथ वाघ, रविंद्र कुलकर्णी, संगीत शिक्षक अभिमन्यू गायकवाड, सुजित अंबुरे, युवराज नळे, शरद वडगावकर, मल्हारी माने यांनी गायन केले. या प्रसंगी सौ. महानंदा माने ,सौ. वर्षा नळे उपस्थित होत्या.

# जय मल्हार गणेश मंडळाचे वाद्यपूजन



आरंभ मराठी | धाराशिव

शहरातील जुनी गल्ली येथील जय मल्हार तरुण गणेश मंडळाच्या वतीने पारंपरिक थाटामाटात आणि ढोल-ताशांच्या गजरात वाद्यपूजन सोहळा मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाला. गणेशोत्सवाच्या स्वागताची ही मंडळाची खास परंपरा असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही या सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या पूजनाचा मान शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज राजाभाऊ साळुंके यांच्या हस्ते संपन्न झाला. ढोल, ताशा, टाळ, मृदंग आदी पारंपरिक वाद्यांची सजावट आणि पूजा मोठ्या श्रद्धेने पार पडली.यावेळी गणेश मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील अनेक गणेशभक्तांसोबतच नितीन देवकते, ज्ञानेश्वर ठेवरे, आबा देवकते, अशोक सोलंकर, राजाभाऊ देवकते, रामेश्वर घोगरे, दत्ता देवकते, सागर कदम, बंडू देवकते, रवी देवकते आदी मान्यवर मंडळासोबत उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा आणखी वाढली.

# युवक काँग्रेसचे महेश देशमुख यांचा राष्ट्रीय सचिवपदी निवड झाल्याबद्दल सत्कार

आरंभ मराठी | मुरुम

उमरगा तालुक्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या संपर्क कार्यालयात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त तसेच लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमात युवक काँग्रेसचे कार्यकर्ते महेश देशमुख यांची भारतीय युवक काँग्रेसच्या राष्ट्रीय सचिवपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या या निवडीमुळे तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. या कार्यक्रमाला जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष विजयकुमार सोनवणे,



ॲड. सुभाष राजोळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नानाराव भोसले, सेवादल जिल्हा उपाध्यक्ष गोविंद पवार, युवक जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) गणेश पवार, तालुका काँग्रेस अध्यक्ष अर्जुन बिराजदार, विधानसभा अध्यक्ष हनुमंत सांगवे, ॲड. दिलीप सगर, संजय चालुक्य, जिल्हा उपाध्यक्ष दादासाहेब गायकवाड, कार्याध्यक्ष अभिषेक औरादे, शहराध्यक्ष विजय दळगडे, युवक काँग्रेस शहराध्यक्ष सोहेल इनामदार, इरफान जमादार, मधुकर यादव, मधुकर बिद्री, ज्ञानेश्वर पाटील, बाबा मस्के, शाहूराज मुगळे, अहमद तांबोळी आदी मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन चंद्रकांत जाधव, अभिमन्यू भोसले, संजय सरवदे, शिवाजी गायकवाड, बाबा मस्के, जीवन सरपे यांच्या पुढाकारातून करण्यात आले. प्रस्तावना ॲड. दिलीप सगर यांनी केली, सूत्रसंचालन ॲड. एस.पी. इनामदार यांनी केले तर आभार प्रदर्शन दादासाहेब गायकवाड यांनी मानले.

# राज्यस्तरीय खुल्या लेखन स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ उत्साहात



आरंभ मराठी | धाराशिव

समरसता साहित्य परिषद यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिजन्मशताब्दी निमित्त राज्यस्तरीय खुल्या लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेचे जिल्हास्तरीय बक्षिस वितरण अभिनव इंग्लिश स्कूल येथे करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सतीश गोपालचंद मोदानी सचिव राजस्थानी बहुउद्देशीय शिक्षण संस्था तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सोमनाथ मोतीराम लांडगे संचालक श्री साई श्रद्धा एज्युकेशन धाराशिव हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक ॲड. सचिन सूर्यवंशी यांनी केले. या कार्यक्रमामध्ये लेखन स्पर्धेतील विजेत्यांना शाल, श्रीफळ, रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यामध्ये प्रथम धनंजय झोंबाडे, द्वितीय श्रीमती उमा सौदागर, तृतीय श्रीमती उज्वला मसलेकर व उत्तेजनार्थ मारुती बनसोडे यांना सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर स्पर्धेतील सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये अनुराधा उपासे, अश्विनी लोखंडे, ॲड. जयश्री तेरकर, मकरंद पाटील, प्रज्ञा महाजन, नेहा कांबळे, तेजस वैष्णव व सोनाली कांबळे यांचा समावेश आहे. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित म्हणून मार्गदर्शन करत असताना प्रा. सोमनाथ लांडगे यांनी अहिल्यादेवी यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकत असताना अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य अतिशय भव्यदिव्य व क्षेत्र, जात, पात या बंधनाच्या बाहेर जाऊन संपूर्ण मानव जातीच्या, प्राण्यांच्या कल्याणासाठी व धर्मासाठी समर्पित असल्याचे सांगितले. अध्यक्ष म्हणून संबोधित करत असताना सतीश मोदानी यांनी अहिल्यादेवीच्या चरित्रामुळे पुन्हा नव्याने काम करण्याची व समाजासाठी काही चांगले करण्याची प्रेरणा मिळते असे सांगितले. या कार्यक्रमासाठी ॲड. रवींद्र कदम राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जिल्हा संघ चालक, शाम बलुतकर सामाजिक समरसता मंच विभाग संयोजक, राजेंद्र कापसे, मनीषा बलुतकर, उषाताई लांडगे, अश्विनी सूर्यवंशी, प्रशांत महाजन, मंगेश तिवारी, ॲड. कृष्णा भोसले, ॲड. नामदेव तेरकर, अहिल्यादेवी होळकर यांच्या आजीचे वंशज अमोल जगन्नाथ मैंदाड, गोरठेकर सर, शाळेतील शिक्षक कर्मचारी वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी कुलकर्णी यांनी तर आभार ॲड. शांतीबळ कांबळे यांनी मानले.

# ११ वी सायन्ससाठी नवोदय विद्यालयात १० ऑगस्टपर्यंत प्रवेश घेता येणार

आरंभ मराठी | धाराशिव

तुळजापूर येथाल पीएम श्री स्कूल, जवाहर नवोदय विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता इयत्ता ११ वी सायन्स शाखेसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, इच्छुक विद्यार्थ्यांना १० ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विद्यालयाचे प्राचार्य किरण इंगळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रवेशासाठी अर्ज ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही पद्धतीने स्वीकारले जात आहेत. अर्ज करण्यासाठी विद्यार्थी दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक असून,विज्ञान व गणित विषयात किमान ६० टक्के गुण असणे गरजेचे आहे. विद्यार्थी व पालकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा,असे आवाहनही त्यांनी केले आहे. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात कोणतीही अडचण आल्यास एस.एस.माने (मो. ९७६६९०८७३३) व श्रीनिवास गज्रम (मो. ९९२१७३०३५७) यांच्याशी संपर्क साधावा,असे विद्यालय प्रशासनाने कळविले आहे.

# भारत विद्यालयात ध्यान धारणा कार्यक्रम

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा तालुक्यातील बेडगा येथील भारत विद्यालयात ध्यानधारणा कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शाळेत दर शनिवारी दहा मिनिटे विपश्यना घेण्यात येते. यामध्ये इयत्ता पाचवी ते दहावीचे विद्यार्थी सहभागी होतात. शनिवारी सकाळी ९ वाजता ध्यानधारणा सत्र गोविंद गुरुजी यांच्या आवाजात प्रभावीपणे पार पडले. विद्यार्थ्यांनी एकाग्रतेने सहभाग घेतल्याने मनोबल, एकाग्रता व शिस्त यामध्ये नक्कीच वाढ होईल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# भाजप नेते शरण पाटील यांच्या हस्ते तालुक्यात विविध गावातील पाणंद रस्त्यांच्या कामाचा भव्य शुभारंभ

## शरण पाटील फाऊंडेशन व महसूल विभागाचा पुढाकार; शेतकऱ्यांच्या दळणवळणाचा प्रश्न सुटणार





आरंभ मराठी | उमरगा

तालुक्यातील सुंदरवाडी, तुगाव, कुन्हाळी, त्रिकोणी, गुगळगाव, भुसनी, कंटेकुर, केसरजवळगा, आलूर, बेळंब अशा एकूण दहा गावांतील पाणंद व शेतरस्त्यांच्या कामाचा भव्य भूमिपूजन शुभारंभ कार्यक्रम शरण पाटील फाऊंडेशन आणि महसूल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सलग तीन दिवसांमध्ये शरण पाटील यांच्या हस्ते करीत उत्साहात पार पडला. ग्रामीण भागातील शेतकरी बांधवांच्या पायाभूत सुविधांची गरज लक्षात घेऊन शरण पाटील फाऊंडेशनने या पाणंद व शेतरस्त्यांची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली आहे. रस्त्याअभावी शेतमालाच्या वाहतुकीत येणारे अडथळे दूर करून शेतकरी हित जपण्याचा हेतू यामागे असून, उमरगा-लोहारा तालुक्यातील या रस्त्यांना महाराष्ट्रातील आदर्श पॅटर्न बनवण्याचा संकल्प करण्यात आला आहे. भूमिपूजन प्रसंगी भाजप नेते शरण पाटील, प्रमुख मान्यवर म्हणून उपविभागीय अधिकारी शेवाळे, उमरगा तहसीलदार श्री. येरमे, उमरगा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मरोड, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपअभियंता बिराजदार, माजी जिल्हा परिषद सदस्य रफिक तांबोळी, उमरगा पंचायत समितीचे माजी सभापती सचिन पाटील, भाजप पदाधिकारी गौस शेख, राजू मुल्ला, सुजित शेळके आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला विविध गावांचे आजी-माजी सरपंच, उपसरपंच, शेतकरी बांधव, युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. शेतकरी बांधवांची मागणी लक्षात घेऊन या रस्त्यांचे मजबुतीकरण, डांबरीकरण व दळणवळण सुलभ होण्यासाठी लागणारी सर्व कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे शेतीमाल बाजारात वेळेत पोहोचण्यास मदत होणार असून, ग्रामीण भागाच्या विकासाला नवे बळ मिळेल, असा विश्वास यावेळी शरण पाटील यांनी व्यक्त केला.

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सोलर टेक्निशियन व मेकॅनिक इलेक्ट्रिकल व्हेईकल अभ्यासक्रमाच्या प्रवेशास सुरुवात

आरंभ मराठी | धाराशिव

येथील भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अर्थात आयटीआय येथे सोलर टेक्निशियन इलेक्ट्रिक व मेकानिक इलेक्ट्रिकल व्हेईकल या दोन नाविन्यपूर्ण आणि आधुनिक व्यवसायाचे यावर्षी पासून प्रवेश दिले जाणार आहेत. या व्यवसाय संदर्भातील प्रशिक्षणासाठी प्रवेश अर्ज दाखल करणे सुरू करण्यात येणार आहे. सोलर टेक्निशियनसाठी २० व मेकॅनिक इलेक्ट्रिकल व्हेईकच्या २४ अशा एकूण ४४ प्रशिक्षणार्थ्यांची यामध्ये प्रवेश क्षमता आहे. तरी अधिकाधिक इच्छुक विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश अर्ज दाखल करावे असे आवाहन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी व प्राचार्य शासकीय आयटीआय धाराशिव यांनी केले आहे.



सध्याच्या काळामध्ये पर्यावरणाची स्थिती आणि मोजक्या नैसर्गिक साधनसामुग्रीचा होत असलेला वारेमाप उपयोग याचा विचार करता, अपरंपरागत ऊर्जा स्तोत्राचा वापर करण्यावर भर देण्यात येत आहे. अशा काळामध्ये सौर ऊर्जेचा वापर संपूर्ण जगभर वाढलेला आहे. यातून रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी मुबलक प्रमाणावर उपलब्ध झालेल्या आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नवनवीन टेक्नॉलॉजीचा वापर करून त्यावर प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देऊन रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध केल्या जातात. याचाच एक भाग म्हणून कौशल्यता विभाग तथा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंत्रालयाने दिलेल्या मान्यतेनुसार यावर्षीपासून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था धाराशिव येथे या दोन नवीन व्यवसायांचा समावेश करण्यात आलेला आहे. याची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्यात येणार आहे. तरी प्रवेश इच्छुक उमेदवारांनी आयटीआय धाराशिव येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# अंकुश रूपरूर व सिध्दाराम मुलगे यांचा शिवसेनेत प्रवेश

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर तालुक्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीच्या अनुषंगाने शिवसेना शिंदे गटात पक्ष प्रवेशाचे सत्र सुरूच असून, बोळेगाव येथील काँग्रेस पक्षाचे सक्रिय ग्रामपंचायत सदस्य अंकुश रूपरूर व भाजपचे सिध्दाराम मुलगे यांनी काँग्रेस व भाजपला रामराम ठोकत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. गेल्या काही दिवसात शिवसेना शिंदे गटात तुळजापूर शहर व तालुक्यात अनेक ठिकाणी शाखांचे उद्घाटन व पक्षप्रवेश सुरु आहेत. शिवसेनेचे उपनेते ज्ञानराज चौगुले यांच्या उपस्थितीत अंकुश रूपरूर व सिध्दाराम मुलगे यांनी भगवा ध्वज हाती घेतला. पक्षाचे सचिव संजय मोरे,



धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक,धाराशिव सह संपर्कप्रमुख भगवान देवकते,जिल्हाप्रमुख मोहन पनुरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा पक्ष प्रवेश सोहळा करण्यात आला. या पक्षप्रवेश कार्यक्रमाचे आयोजन तालुकाध्यक्ष अमोल जाधव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. यावेळी तुळजापूर शहर उपाध्यक्ष रमेश चिवचिवे, भुजंग मुकेरकर, युवा नेते शहाजी हाक्के यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CMYK

# पवनचक्कीच्या ऊर्जेतून जिल्ह्यात गुंडगिरीला बळ

## पवनचक्कीसाठी भौगोलिक परिस्थिती अनुकूल मात्र सामाजिक परिस्थिती प्रतिकूल

### प्रशासनाने सामंजस्याची भूमिका घेतल्यास जिल्ह्यात गुंतवणुकीला वाव

अभिजित साळुंके | आरंभ मराठी

लोहारा –धाराशिव जिल्ह्याची भौगोलिक स्थिती सौरऊर्जा आणि पवनऊर्जेसाठी अत्यंत उपयुक्त आहे. वर्षातील ३६५ दिवसांपैकी ३०० दिवस या जिल्ह्यात स्वच्छ सूर्यप्रकाश असतो. हे पोषक वातावरण पाहता जिल्ह्यात कंपन्यांनी मोठी गुंतवणूक केली आहे. प्रकल्पाच्या उभारणीसाठी जमीन संपादित करताना शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करणे, त्यांच्या हिताला व्यापक प्राधान्य देण्याची गरज निर्माण झाली आहे. धाराशिव जिल्ह्यात हे क्षेत्र वाढत आहे पण त्याबरोबरच अडचणी देखील वाढत आहेत. पवनचक्की कंपन्यांच्या माध्यमातून मोठी गुंतवणूक होत असली तरी कायदा आणि सुव्यवस्थेचा देखील प्रश्न निर्माण होत आहे.

धाराशिव जिल्ह्यात पवनचक्की व सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या अनेक कंपन्यानी अकृषी कर (बिगर शेती कर) व गौण खनिज कर न भरल्याने सरकारचा करोडो रुपयांचा महसुल बुडाला आहे. अनेक कंपन्यानी अकृषी परवाना घेतला नसुन, पवनचक्की कामासाठी लागणाऱ्या उत्खननाचा गौण खनिज कर भरलेला नाही, जिल्ह्यात किती ठिकाणी पवनचक्की व सोलर प्रकल्प सुरु आहेत याची ठोस माहिति महसुल विभागाकडे नाही हे विशेष. गाव पातळीवरील स्थानिक अधिकारी व कर्मचारी यांना चिरीमिरी देत कंपन्या प्रकल्प उभे करीत आहेत. अनेक ठिकाणी पवन व सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या कंपन्यानी शासकीय व भुसंपादित जमिनीवर अतिक्रमण करुन प्रकल्प उभे केले आहेत. जिल्ह्यातील सर्व प्रकल्पाची स्थळ पाहणी करुन एक विशेष मोहीम राबविणे गरजेचे आहे. पवनचक्कीच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यात माफिया मोठ्या प्रमाणात सक्रीय झाला असुन, काही राजकीय नेत्यांचे आशीर्वाद असल्याने गावपुढारी, पोलिस ठाणे स्तरावरील अधिकारी व वसुली करणाऱ्या गुंडाच्या टोळ्या मालामाल झाल्या आहेत. पवनचक्की व सोलर कंपनीला कामगार व साहित्य पुरविणे, बांधकामाचे सिव्हिल, कामाची ठेकेदारी व सुरक्षा पुरविण्याच्या नावाखाली टोळीयुद्ध व त्यांतुन गोळीबाराच्या घटना घडल्या आहेत. जिल्ह्यात तीन ते चार गँग सक्रीय झाल्या आहेत. शेतकऱ्यांना मारहाण दमदाटी करणे यासारखे प्रकार वाढले आहेत. सौर ऊर्जा व पवनचक्की प्रकल्प फार पुर्वीपासुन कार्यरत आहेत. मात्र महसूल विभागाकडे त्यांची आकडेवारी उपलब्ध नाही. किती कंपन्यानी अकृषी परवाना घेतला ? किती कर भरला ? यांची कोणतीही माहिती महसुलकडे उपलब्ध नाही.



### जमिनी खरेदी करताना शेतकऱ्यांची फसवणूक

या प्रकल्पांसाठी जमिनीचा करार करताना शेतकऱ्यांना अडचणी येतात. काही कंपन्या या कराराचा मसुदा केवळ इंग्रजीत तर काही कंपन्या इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांमध्ये तयार करतात. करारात ठरलेल्यापेक्षा अधिक जमीन घेण्यात आल्याचे प्रकारही या भागात घडले आहेत. हे सर्व टाळून प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी एक प्रारूप आराखडा करणे गरजेचे आहे. कंपन्या शेतकऱ्यांसोबतचा करार इंग्रजी भाषेत करतात. काही कंपन्या इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांमध्ये करार करतात. इंग्रजी भाषेतील करार शेतकऱ्यांच्या लक्षात येत नाही. त्यामुळे फसवणुकीचे प्रकार घडले आहेत. असे प्रकार घडले की दलालांचे फावते. त्यामुळे आता नवीन प्रारूप आराखड्यानुसार सर्वच कंपन्यांना मराठीतूनही करार करणे बंधनकारक करावे.

### समन्वय समितीची मोठी जबाबदारी

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील पवनऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती आणि महसूल उपविभाग स्तरावर उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पवनऊर्जा प्रकल्प समन्वय समिती स्थापन करावी, असे निर्देश २०१३ च्या 'जीआर'मध्ये देण्यात आले आहेत. या समितीत जिल्हा परिषदेचे सीईओ आणि पोलिस दलासह अन्य अधिकाऱ्यांचा समावेश करण्याची सूचना आहे.

### गौण खनिजाची बेसुमार लूट

लोहारा तालुक्यातील अनेक पवनचक्क्याच्या वाहतुकीसाठी अवैध उत्खनन केले जात आहे. यात ना ग्रामपंचायत चा कर ना शासनाचा कर भरला जातो. नाममात्र कर भरून १००० ट्रिप चा मुरुम उचलला जातो. यात तहसील कार्यालय व ग्राम पंचायत अधिकारी यांच्या संगणमताने कारभार चालू असतो. ग्रामपंचायत ची नाहरकत न घेता गायरान जमिनीवरील गौनखनिज कर न भरता उचलला जातो. मुरुम वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर व जेसीबी या वाहनधारकांचा ना परवाना तपासला जातो, ना कोणती कागदपत्रे तपासली जातात. जर गावकऱ्यांनी अडवणूक केली तर त्याच्यावर स्थनिक एजन्ट कडून दमदाटी केली जाते व पोलीसांकडून खोटे गुन्हे दाखल केले जाते.

### पोलीस व महसूल प्रशासनाचा वाढता हस्तक्षेप

लोहारा तालुक्यात ४४ गावे आहेत. त्यात एकच पोलीस स्टेशन असून अपुऱ्या कर्मचाऱ्यामुळे अनेक अडचणीला सामोरे जावे लागत असते. पण पवनचक्की प्रकल्पात काही अडचणी झाल्यास तात्काळ पोलीस प्रशासन मध्ये भाग घेत असते. तालुक्यात एखादा गुन्हा घडल्यास गुन्हा नोंद करण्यास टाळाटाळ केली जाते. परंतु, पवनचक्की प्रकल्पात काही अडचणी निर्माण झाल्यास तात्काळ दखल घेतली जाते. हेच महसूल विभागाचे आहे.

### ग्रामपंचायतचा कर चुकवणे

एक पवनचक्की उभी करण्यासाठी १५ ते २० कोटी रुपये लागतात. त्या नुसार ग्राम पंचायतची ना हरकत घेणे बंधनकारक असून त्यानुसार लाखो रुपये कर मिळणे अपेक्षित असते. पण तसे न होता स्थानिक राजकीय पुढारी व सरपंच यांना हाताशी धरून ग्रामपंचायतचा लाखो रुपयेचा कर बुडवला जातो. एक पवनचक्की वर्षाला २ ते ४ कोटी रुपये एवढा नफा कमवते. त्याचे आयुष्य २० वर्ष इतके आहे. त्या नुसार लाखो रुपये कर येणे अपेक्षित असून तसे होताना कुठे दिसत नाही.

### कमी मावेजा देऊन जमिनी बळकावल्या

लोहारा तालुक्यातील पवनचक्की प्रकल्पानी अनेक नियमाची पायमल्ली केली आहे. अनेक ग्राम पंचायत व शासनाचा लाखो रुपयाचा कर बुडवला आहे. तालुक्यात विविध कंपन्याच्या जवळपास १०० हुन अधिक पवनचक्क्या असून लोहारा तालुक्यातील माळरान जमिनीचे शासकीय मूल्यांकन ४ लाख असून, त्या नियमानुसार खरेदी ही १६ लाख रुपये प्रति एकर ने करणे बंधनकारक आहे. परंतु शेतकऱ्यांकडून ८ ते ९ लाख रुपये देऊन खरेदी करत आहेत. कंपनीचे इंजिनिअर, अधिकारी व शासकीय अधिकारी यांच्या सगणंमताने शेतकऱ्याला करोडो रुपयांचा चुना लावण्यात आला आहे.

# मनोज जरांगे-पाटील आज धाराशिवमध्ये; मराठा आंदोलकांसोबत संवाद साधणार

आरंभ मराठी | धाराशिव



मराठा आरक्षण आंदोलनाचे नेतृत्व करणारे मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे उद्या, मंगळवारी धाराशिव शहरात येत आहेत.या पार्श्वभूमीवर तयारी करण्यात आली असून, सकाळी १० पासून ते आंदोलकांसह विद्यार्थी, उद्योगपती, व्यापाऱ्यांशी संवाद साधणार आहेत.येत्या २९ ऑगस्ट रोजी मुंबईत होणाऱ्या भव्य मराठा मोर्चाच्या पार्श्वभूमीवर, हा दौरा अत्यंत निर्णायक मानला जात आहे. या दौऱ्यात ते धाराशिव जिल्ह्यातील मराठा आंदोलक, समन्वयक, समाजप्रमुख आणि कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधणार आहेत.शहरातील हॉटेल साईलीला (राजासाब) येथे त्यांचा मुक्काम असेल.या बैठकीत २९ ऑगस्टच्या मोर्चाची पूर्वतयारी, जिल्हानिहाय जबाबदाऱ्या, सरकारकडून करण्यात येणाऱ्या आश्वासनांची सद्यस्थिती, समाजातील युवांचा सहभाग आणि पुढील दिशा या विषयावर चर्चा करण्यात येणार आहे. जिल्हाभरातून मराठा कार्यकर्ते मोठ्या संख्येने या बैठकीला उपस्थित राहण्याची शक्यता आहे.मनोज जरांगे पाटील यांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे की, हा आरक्षणाचा लढा शेवटचा आहे. यावेळी मराठा समाजाला नुसते आश्वासन चालणार नाही, तर ठोस निर्णय हवा.त्यामुळे त्यांच्या या दौऱ्याला राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.धाराशिव जिल्ह्यातील मराठा समाज बांधवांनी या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# रोटरी क्लबच्या वतीने विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप



**धाराशिव–** रोटरी क्लब तर्फे ए.पी.प्रायमरी स्कूलमध्ये गरजू विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटप करण्यात आले. रोटरी क्लबच्या पदग्रहण सोहळ्यात मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते या कार्यक्रमाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला होता. त्यानंतर वेगवेगळ्या शाळांमध्ये गरजेनुसार स्कूल बॅगचे वाटप करण्यात येत आहे. यावेळी धाराशिव रोटरीचे अध्यक्ष रणजित रणदिवे,सचिव प्रदीप खामकर,अभिजीत पवार, सुनील गर्जे, पी.आर.काळे,निशांत होणमोटे, सुरज कदम, मेघश्याम पाटील व जना स्मॉल बँकेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**धाराशिव–**शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात जयंतीदिनी साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, अमित शिंदे, सुनील काकडे, अभय इंगळे, राजसिंहा राजेनिंबाळकर, अक्षय ढोबळे, नितीन शेरखाने, प्रल्हाद धतुरे आदींच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी दत्ता पेठे,विलास लोंढे, खंडू चांदणे, बापू पवार, किसन पेठे, सलीम शेख, मंगेश साळुंके,पप्पू कांबळे,मुस्ताक शेख, बाबा डोलारे, सोमनाथ पेठे, अजय चव्हाण, शिवा तुपे, सोनू गव्हांडे, विठ्ठल विधाते यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# सुनील माळी यांचा गौरव

आरंभ मराठी | धाराशिव



सुनील माळी यांचा उत्कृष्ट कर्मचारी म्हणून जिल्हाधिकारी किर्ती कुमार पुजार यांच्या हस्ते महसूल दिनाचे औचित्य साधून सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा भूम येथील महसूल दिनाच्या कार्यक्रमांमध्ये गौरव करण्यात आला. यामध्ये कळंब तालुक्यातून मंगरूळ येथील महसूल सेवक सुनील माळी यांचा जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांचे हस्ते उत्कृष्ट कर्मचारी म्हणून गौरव चिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला..

# शैक्षणिक गुणवत्ता विकास, संशोधन व नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा निर्धार

## राष्ट्रीय-राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांची जिल्हा कार्यकारिणी जाहीर



आरंभ मराठी | धाराशिव

राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे सशक्त व्यासपीठ असलेल्या राज्य,राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक संघ महाराष्ट्र या संघटनेच्या धाराशिव जिल्हा शाखेची महत्त्वपूर्ण बैठक दिनांक ३ ऑगस्ट रोजी शहरात उत्साहात पार पडली.

जिल्हाध्यक्ष दिलीप चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या, शैक्षणिक समस्या, गुणवत्ता विकास, संशोधन, व नवोन्मेषी उपक्रमांची अंमलबजावणी यासंदर्भात सविस्तर विचारमंथन करण्यात आले. या वेळी संघटनात्मक बांधणीसह सन २०२५ ते २०२८ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.नव्याने निवडलेली जिल्हा कार्यकारिणी पुढीलप्रमाणे: राज्य प्रतिनिधी श्री. भैरवनाथ कानडे, छत्रपती संभाजीनगर विभाग प्रतिनिधी श्री. समाधान शिकेतोड, श्री. कमलाकर मोटे जिल्हाध्यक्ष श्री. दिलीप चौधरी , जिल्हा सरचिटणीस श्री. विक्रम पाचंगे जिल्हा सल्लागार श्री. सुभाष वैरागकर , श्रीम. दिपाली सबसगी जिल्हा कार्याध्यक्ष श्री. रामकृष्ण पाटील जिल्हा कोषाध्यक्ष श्री. बालाजी इंगळे , जिल्हा उपाध्यक्ष श्री. कुंडलिक पवार, श्रीम. रंजना स्वामी जिल्हा प्रसिद्धी प्रमुख श्री. बळीराम घोरवडे जिल्हा मुख्य संघटक डॉ. शिवाजी चव्हाण, श्री. उमेश खोसे जिल्हा संपर्कप्रमुख श्री. बाळासाहेब चिवडे, श्रीम. सुनंदा निर्मळे संघटक सदस्य श्री. कमलाकर भोसले, श्री. विठ्ठल कदम, श्री. सुनील पुजारी, श्री. संजय देशमुख, श्री. मनोहर वाघमोडे, श्री. साहेबराव देशमुख, श्री. प्रमोद अनपट, श्री. उदय पाटील, डॉ. शहनाज औसेकर, डॉ. तबस्सुम सय्यद आदींची निवड करण्यात आली .यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्य प्रतिनिधी श्री. भैरवनाथ कानडे व विभागीय प्रतिनिधी समाधान शिकेतोड हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.शिवाजी चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन विक्रम पांचगे यांनी केले .

# कुलस्वामिनी नॅचरल शुगर्स यंदा दीड लाख मेट्रिक टन ऊस गाळप करणार

## कारखान्याचे संस्थापक तावडे यांचा निर्धार, मिल रोलर पूजन उत्साहात

आरंभ मराठी | धाराशिव



धाराशिव तालुक्यातील बेंबळी येथील कुलस्वामिनी नॅचरल शुगर्सचे गळीत हंगाम २०२५-२६ साठीचे मिल रोलर पुजन बेंबळी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी कारखान्याचे संस्थापक तथा धाराशिवचे माजी नगराध्यक्ष मधुकरराव तावडे यांनी यावर्षी कारखाना दीड लाख मेट्रिक टन ऊस गाळप करणार असल्याचे सांगितले. या रोलर पूजन कार्यक्रमासाठी कारखान्याचे चेअरमन आकाश मधुकरराव तावडे, जनरल मॅनेजर शरद गुंड, बिट आमलदार सुनिल कोळेकर, रमेश कदम, पोलीस बोंदर, खलील शेख, चिफ केमिस्ट श्री.माने, मुख्य शेतकी अधिकारी तवले, राजाभाऊ गुंड ऊस पुरवठा अधिकारी सचिन मुंडे व सर्व कर्मचारी उपस्थित होते.यावेळी बोलताना संस्थापक मधुकरराव तावडे म्हणाले, यंदाच्या हंगामातील तोडणी, वाहतुक यंत्रणा सज्ज असून, यंत्र सामग्रीच्या दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करुन कारखाना आक्टोंबर महिन्यात चालु करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी यांनीसहकार्यकरावे.

# राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त पोउपनि मधुकर घायाळ यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

आरंभ मराठी | धाराशिव




राष्ट्रपती पोलीस पुरस्कार प्राप्त मधुकर काशिनाथराव घायाळ धाराशिव पोलीस दलातून तब्बल ३९ वर्ष सहा महिन्यांच्या प्रदीर्घ सेवेनंतर पोलीस उपनिरीक्षक पदावरून निवृत्त झाले. त्यानिमित्त प्रभारी पोलीस अधीक्षक शफकत् आमना यांच्या हस्ते घायाळ यांचा सपत्नीक व सहपरिवार सत्कार करून निरोप देण्यात आला. श्री घायाळ हे धाराशिव पोलीस दलात १९८६ रोजी कर्तव्यावर रुजू झाले होते. त्यांनी स्थानिक गुन्हे शाखा, दरोडा प्रतिबंधक पथक, तुळजापूर मंदिर पोलीस चौकी, वाशी पोलीस ठाणे, नागरी हक्क संरक्षण कायदा विभाग या ठिकाणी उत्तमरीत्या कर्तव्य बजावले. त्यांनी या सेवकालामध्ये खून, दरोडे, अपहरण, घरफोडी वाटमारी, यासारख्या गंभीर गुन्ह्याचा तपास करून आरोपींना गजाआड केले. या कार्यासाठी तत्कालीन राष्ट्रपती अब्दुल कलाम यांनी श्री घायाळ यांना पोलीस राष्ट्रपती पुरस्कार जाहीर केला. यानंतर पोलीस महासंचालकांनी त्यांचे विशेष सेवा पदक श्री घायाळ यांना बहाल केले. सदरील कार्यकाळात श्री घायाळ यांना १७८३ इतके बक्षिसे मिळाली आहेत. श्री घायाळ यांनी या ३९ वर्षाच्या सेवा काळामध्येमुलांनाहीयोग्यशिक्षणदिले,त्यांची मुलगी कॉम्प्युटर इंजिनियर आहे तर मुलाची स्वतःची डिजिटल मार्केटिंग कंपनी आहे.

# अतिवृष्टी अनुदान मिळवून दिल्याबद्दल अनिल जगताप यांचा गावोगावी सत्कार

आरंभ मराठी | लोहारा

खरीप हंगाम २०२४ मधील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या लोहारा व उमरगा तालुक्यातील शेतकऱ्यांना तब्बल ८६ कोटी ४६ लाख रुपयांचे अनुदान मिळवून देणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांचा तालुक्यातील अनेक गावांमध्ये सत्कार करण्यात येत आहे. सुरुवातीला जिल्हा प्रशासनाने ८ ऑक्टोबर रोजी कळंब, धाराशिव व वाशी या तालुक्यांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता. मात्र, लोहारा व उमरगा यांची नावे त्यातून वगळण्यात आली होती. ही बाब तत्काळीन जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांच्या निदर्शनास आणून देत, अनिल जगताप यांनी लोहारा व उमरगा तालुक्यांचा समावेश करण्याची मागणी केली होती. त्यांच्या या पाठपुराव्यामुळे लोहारा व उमरगा महसूल व कृषी विभागाने प्रस्ताव तयार करून जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केला. यानंतर जिल्हा प्रशासनाने ७९,८८० शेतकऱ्यांसाठी ८६ कोटी ४६ लाखांचा प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पाठवला, जो २८ ऑक्टोबर रोजी मंत्रालयात पोहोचवण्यात आला. परंतु, सरकारकडून वेळोवेळी निघणाऱ्या निर्णयांमध्ये लोहारा-उमरग्याचा समावेश होत नव्हता. अखेर ३० एप्रिल रोजी अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली प्रवीण स्वामी, सक्षणा सलगर, अजिंक्य पाटील, अमोल बिराजदार यांच्यासह लोहारा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. दरम्यान, उपायुक्त कार्यालयातील प्रस्ताव मदत व पुनर्वसन सचिव कैलास गायकवाड यांच्याकडे थेट सुपूर्द करण्यात आला.



तरीही शासन निर्णय होत नव्हता. म्हणून जगताप यांनी नारंगवाडी येथे रस्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला. यानंतर सरकारला जाग आली आणि २९ जुलै २०२५ रोजी शासन निर्णय काढण्यात आला. त्यानुसार, लोहारा तालुक्यातील ३०,६५२ शेतकऱ्यांना ३३.७० कोटी रुपये तर उमरग्यातील ४९,६८२ शेतकऱ्यांना ५२.७५ कोटी रुपये मंजूर झाले. या सर्व लढ्याचे श्रेय सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांच्या अथक प्रयत्नांना जाते, हे लक्षात घेऊन उंडरगाव, रेबे, चिंचोली, हराळी, नागूर, कास्ती बुद्रुक आदी गावांमध्ये त्यांचा शेतकरी बांधवांच्या वतीने सत्कार करण्यात आला. शासनात कोणतेही पद नसताना केवळ सामाजिक बांधिलकीतून लढा देऊन एवढी मोठी रक्कम मिळवून देणारे अनिल जगताप हे शेतकऱ्यांच्या नजरेत खरे हिरो ठरले आहेत.

# युवराज नळे राज्यस्तरीय समरसता साहित्य पुरस्काराने सन्मानित

आरंभ मराठी | धाराशिव

नांदेड येथे संपन्न झालेल्या समरसता साहित्य संमेलन मध्ये धाराशिव येथील ज्येष्ठ साहित्य युवराज नळे यांना 'तिच्या कविता' या काव्यसंग्रहाबद्दल जेष्ठ साहित्यिक पद्मश्री नामदेव कांबळे यांच्या शुभहस्ते 'राज्यस्तरीय समरसता साहित्य पुरस्काराने' सपत्नीक सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी समरसता साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ ईश्वर नंदापुरे, माणिक भोसले, कार्यवाह डॉ प्रसन्न पाटील यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. 'तिच्या कविता' हा काव्यसंग्रह स्त्रीच्या वेगवेगळ्या रूपांचे शब्दांकन असून समस्त स्त्री आणि पुरुष वर्गातही हा काव्यसंग्रह अत्यंत लोकप्रिय झाला आहे. या काव्यसंग्रहातील प्रत्येक रचना 'ती'ला समर्पित असून अनेक दाहक वास्तवतेचेही चित्र या काव्यसंग्रहातून नजरेसमोर उभे राहते. म्हणूनच तज्ञ समितीने परीक्षणाच्या निकषावर राज्यस्तरीय समरसता पुरस्कार साठी तिच्या कविता काव्यसंग्रहाची निवड केली आहे असे संयोजकांनी सांगितले.

जेष्ठ साहित्यिक युवराज नळे यांना मिळालेल्या या प्रतिष्ठेच्या पुरस्काराबद्दल समाजाच्या सर्व स्तरातील प्रतिष्ठित मंडळींकडून अभिनंदन होत आहे.